# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २१/०१/२०२६ (बुधवार )**

## घरफोडीचे २ गुन्हे उघड, स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत दिनांक २५/१२/२०२५ रोजी मौजा राठी लेआउट कोंढाळी येथे फिर्यादी गुलाब सदाशिवराव चन्ने , वय ७० वर्ष, रा. राठी लेआउट कोंढाळी हे घराला कुलुप लावुन शेतात गेले होते. घरी परीत आल्यावर त्यांच्या घराला लावलेले कुलुप तुटलेले दिसलेले. अज्ञात आरोपीतांनी घरफोडी करण्याचा प्रयत्न केल्याने सदर प्रकरणी कलम **कलम ३३१(३)३०५(अ),६२ भान्यासं** अन्वये गुन्हा नोंद केला होता.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सदर गुन्ह्याचे समांतर तपासात स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांनी सुरू केला. गुप्तबातमीदारांच्या माहीतीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या अधारे दिनांक १९/०१/२०२६ रोजी **१) अंश उर्फ अंशुल नितीन गजबे वय २४ वर्षे रा. दत्तात्रय नगर नागपूर २) आर्यन मदन मेश्राम वय २३ वर्षे, रा.ताजश्री नगर नागपूर यांना नागपुर येथुन** ताब्यात घेवुन नमुद आरोपीकडे सखोल आणि कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी सद गुन्हा केल्याबाबत कबुली दिली. या व्यतिरिक्त नमुद आरोपीतांनी कारंजा घाडगे जि. वर्धा येथे सुद्धा घरफोडी केल्याचे कबुली दिली.

**पोलीसांनी नमुद आरोपीकडुन गुन्हयात गुन्हा करण्यासाठी वापरलेले टीव्हीएस कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच ४० बी आर १९२५ किमती ६५००० /— रू**

**२) एक लोखंडी रॉड असा एकुण किंमती ६५१५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.**

**उघड गुन्हे**

**१) पो.स्टे कोंढाळी अप क्र ७५२/२५ कलम ३३१(३),३०५(अ) भान्यासं**

**२) पो.स्टे. कारंजा घाडगे अप क्र ८७४/२५ कलम ३३१(३),३०५(अ), भान्यासं**




## अल्पवयीन मतिमंद बालीकेसोबत लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :— फिर्यादी हीच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अप क्र. २४१/२०१७ कलम ३७६ (२)(जे)(एल) भादवी सहक ४,६ पोक्सो सहकलनम अ.जा.ज.अ.प्रति.अधिनियम अन्वय अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादीची पुतनी पिडीत ही अल्पवयीन तसेच मतिमंद आहे हे माहीत असतांना दिनांक १३/१२/२०१७ चे पुर्वी पासुन यातील आरोपी नामे दिलीप नत्थु शेंडे, वय ४६ वर्ष रा. रोहना ता नरखेड याने पिडीतेवर लैंगिक अत्याचार केल्याने नमुद पिडीता गर्भवती झाली.

तपासी अधिकारी श्री विक्रम कदम, उपविभागिय पोलीस अधिकारी,काटोल उपविभाग यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. दिनांक २१/०१/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश १२ श्री जहीर अब्बास शेख यांनी नमुद आरोपी दिलीप नत्थु शेंडे वय ४६ वर्ष रा. रोहना ता नरखेड **यास कलम ३७६ (२) (एल) भादवी मध्ये आजन्म कारावास व १०,००० /— रू. दंड , दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्री प्रशांत साखरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन सफौ ३४७ रविंद्र कांबळे, पो. स्टे. जलालखेडा यांनी मदत केली आहे.

## पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील अवैध दारू व्यवासायात सक्रिय महीला आरोपीचा शोध घेवुन एम.पी.डी.ए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत महीला **आरोपी नामे कौतुके दिलीप राजपुत, वय ५० वर्षे, रा. पारधी बेडा, तिडंगी** हीचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. नमुद महीला असे गुन्हे करण्याच्या सवयीची आहे. नमुद महीला आरोपी ही हातभट्टी मोहाफुल गावठी दारू तयार करून विक्री करते . तिचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी कारवाई करून तिचेवर गुन्हे नोंद केले. तसेच पोलीसांनी तिचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु **कौतुके दिलीप राजपुत** हीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. तिच्या गुन्हेगारी कृत्यामुळे अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. नमुद आरोपीचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात केळवद पोलीसांकडुन एम.पी.डी.ए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी दिनांक ०९/०१/२०२६ रोजी नमुद महीला आरोपीला स्थानबध्द करण्याचा आदेश पारीत केला होता परंतु नमुद महीला ही मिळुन येत नव्हती.

**केळवद पोलीसांनी नमुद महीला आरोपी नामे कौतुके दिलीप राजपुत, वय ५० वर्षे, रा. पारधी बेडा, तिडंगी हीचा शोध घेवुन दिनांक २०/०१/२०२६ रोजी ताब्यात घेवुन तिला मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद उमरेड पोलीस यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २०/०१/२०२६ रोजी उमरेड पोलीस पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मोहपा फाटा, उमरेड येथे नाकाबंदी केली असता १० चक्का ट्रक क्र एम एच ४० बी एल ४७१८ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. **वाहन चालक** आरिफ नफीस खान, वय ३१ वर्षे, रा. अजराळ, ता. खरखोदा, जि मेरठ, राज्य, उत्तर प्रदेश ह.मु. खरबी, ता.जि नागपुर **हा मिळुन आला.** नमुद आरोपीने परवान्यापेक्षा जास्त रेती भरलेली आढळली. आरोपीने तो स्वत:च वाहन मालक असल्याचे सांगितले.

**पोलीसांनी पंचासमक्ष वर** १० चक्का ट्रक क्र एम एच ४० बी एल ४७१८ **किमती १५,००,००० /—रूपये आणि ६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण १५,३०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी यांच्या विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# अवैधरित्या देशीदारू, मोहाफुल दारू बाळगणाऱ्या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर,नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई, ९ गुन्हे नोंद एकुण ७,४२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २०/०१/२०२६** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ७,४२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**पोलीस स्टेशन बेला येथे आरोपी** १) विषाल पांडुरंग जोगे, वय ३८ वर्ष, रा. दहेली ता. जि. नागपुर, २) कुंडलिक वामण वाणी, वय ३८ वर्षे, रा. चनोडा, ता.उमरेड, जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे. **पोलीस स्टेशन भिवापुर** राजेश पुरूषोत्तम पाटील ,वय ५१ वर्ष, रा. सिध्दार्थनगर, ता. भिवापूर, जि. नागपूर याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन कुही** येथे यश दिनेश बावरिया, वय २० वर्ष, रा. कळमना,. ता. जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा नोंद आहे**, पोलीस स्टेशन कन्हान** येथे विश्वनाथ ईस्मल लोंढे, वय ६५ वर्ष, रा. एम.जी. नगर, कन्हान, ता. पारशिवनी याचेवर **गुन्हा नोंद आहे**, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे नितीन रामकृष्णा रेवतकर, वय ४३ वर्ष, रा. शनि चौक, काटोल ता. काटोल याचेवर **गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी नामे विजय चंद्रभान खंडाते, वय ३६ वर्ष, रा. कोरमेटा याचेवर गुन्हा नोंद आहे**. पोलीस स्टेशन केळवद** येथे आरोपी नामे श्याम देवाजी नारनवरे वय ४५ रा. खैरी ढालगावयाचेवर गुन्हा नोंद आहे, **पोलीस स्टेशन वेलतुर** येथे आरोपी ताराचंद नथ्थु मेश्राम, वय ५५ वर्ष ,आणि महीला आरोपी दोन्ही रा. पचखेडी यांचेवर १ **गुन्हा नोंद आहे.** वरप्रमाणे **महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ९ गुन्हे दाखल केले आहे.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**